डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील अधिकारी कर्मचा-यांना दि.१ जुलै,२०१९ ते दि. ३० नोव्हेंबर,२०१९ या कालावधीत अनुज्ञेय महागाई भत्ता वाढीची थकबाकी मंजूर करण्याबाबत.

# डॉ .पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा : १) या विभागाचे आदेश.क्र. निमवा/२०१९-२०/३०३९ ,दि१५/०१/२०२० .

२) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. मभवा-२०१९/ प्र.क्र.३०/सेवा-९, दि.७ ऑक्टोंबर, २०२१.

३) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. निमवा-२०२१/ प्र.क्र.३६/ सेवा-४, दि.७ ऑक्टोंबर, २०२१.

## आदेश

जा.क्र. अप्रवि/मभवा/निमवा/२०२१-२२/ ११३६. दि. १४/१०/ २०२१.

उपरोक्त आदेश क्र. १ नुसार दि१५/०१/२०२० अन्वये निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन (७ व्या वेतन आयोगानुसार) रकमेवर ५ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच त्यावेळच्या १२% महागाई भत्त्या ऐवजी निवृत्ती वेतनाच्या / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या १७% महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे.

शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थेतील अधिकारी / कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन धारकांना सदर महागाई भत्त्याची वाढ दि. १ डिसेंबर, २०१९ पासून लागू करण्यात आलेली आहे. आता संदर्भ २ व ३ शासन निर्णयान्वये १ जुलै,२०१९ ते ३० नोव्हेंबर,२०१९ या पाच महिन्यांच्या कालावधीतील अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे ऑक्टोंबर,२०२१ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

सदहू महागाई भत्त्याची थकबाकी माहे ऑक्टोंबर,२०२१ देय नोव्हेंबर चे नियमित वेतन, निवृत्तीवेतन देयकात रोखीने अदा करावी किंवा त्या पुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयके पारीत केली जाणार नाहीत. महागाई भत्ता वाढीच्या थकबाकी अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०२१-२२ चे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनांतर्गत सन २०२१-२२ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्ता थकबाकी विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. द्वितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्त्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणी प्रस्ताव सबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भा.कृ.अ.प.स त्वरीत सादर करावा.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रति: १) नियंत्रण अधिकारी (सर्व) / आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) / विभागप्रमुख(सर्व),डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.

२) प्राचार्य________________________________________.

३) अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर.

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना वरील कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे ऑक्टोंबर,२०२१ देय नोव्हेंबर,२०२१ चे नियमित मासिक वेतन / निवृत्ती वेतन देयकात प्रदान करण्यात यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारीत करु नये.

नियंत्रक

R.RAUT Budget